**<u>नियमित दिवाणी दावा क्रमांक ५२/२०२४ मधील निशाणी क्रमांक २५ खालील आदेश</u>**

**<u>(MHRT08-000312-2024)</u>**

दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. अभिलेख पाहिले.

०२. प्रस्तुतचा दावा हा सरस–निरस–मानाने वाटप तुटक होवुन मिळण्यासाठी दाखल करण्यात आला आहे. दावा अदयाप प्राथमिक स्थितीत प्रलंबित असल्याचे दिसुन येते.

०३. अर्जातील कथनाप्रमाणे, प्रतिवादी क्र. ०७ च्या नावामध्ये तिचे सासरचे नाव – जानकी रघुनाथ पाटोळे व प्रतिवादी क्र. १५ च्या पतीचे नाव – प्रविणचंद्र, अशा नावातील दोन्ही दुरुस्ती मागितल्या आहेत. सदरचा अर्ज विलंबाने दिला असल्याचे मोघम आक्षेप म्हणणे विरुध्द पक्षकार – प्रतिवादी क्र. ०१ ,०२ व ०४ तर्फे दाखल करण्यात आले आहे. बाकी हजर प्रतिवादी यांनी अर्जास म्हणणे दाखल करुन हरकत घेतलेली नाही.

०४. अर्जात मागितलेली दुरुस्ती मंजूर करणे, उभय पक्षकारांमधील वादाचे मुद्दे अंतिमतः निकाली काढण्यासाठी गरजेचे वाटते. दावा अद्याप प्राथमिक स्थितीत प्रलंबित असल्याने अर्ज मंजूर केल्यास सदर प्रतिवादींचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल असे दिसुन येत नाही. अर्ज मंजूर केल्यानंतर सदर प्रतिवादींना त्यांची विशोधीत कैफियत मांडण्याची पुर्णपणे संधी मिळणार आहे. याउलट, अर्ज नामंजुर केल्यास वादीचे जास्त नुकसान होईल असे दिसुन येते. सबब, अर्ज खर्चाच्या अटीवर मंजूर होण्यास पात्र

असल्याने मी खालील आदेश पारीत करीत आहे –

## <u>आदेश</u>

१. अर्ज प्रतिवादी क्र. ०१, ०२ व ०४ यांना एकत्रीतपणे रक्कम रुपये २००/– इतका खर्च देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. वरीलप्रमाणे मंजूर झालेली दुरुस्ती वादीने मुदतीत करुन दुरुस्तीप्रत अभिलेखावर मुदतीत दाखल करावी.

ROHINI RAJENDRA KULKARNI
Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2025.09.20 11:44:53 +0530

**(रोहिणी आर. कुलकर्णी)**

**दि. १९/०९/२०२५** **दिवाणी न्यायाधीश क. स्तर देवरुख**

**स्थळः देवरुख** **जि. रत्नागिरी.**

| -: **<u>C E R T I F I C A T E</u>** :- | | |
|---|---|---|
| I affirm that the contents of this pdf file Order are same word as per original Order. | | |
| Name of Stenographer | : | S. A. Bhale |
| Court Name | : | Civil Judge,(J.D.) & J.M.F.C., Deorukh |
| Date of Decision | : | 19/09/2025 |
| Order signed by Presiding Officer on | : | 19/09/2025 |
| Order uploaded on | : | 20/09/2025 |